# खडकवासल्यात स्वच्छता मोहीम

पुणे : पंख व क्विकहिल फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने शाळांगण प्रकल्पांतर्गत खडकवासल्यात रयत शिक्षण संस्थेचे यशवंत विद्यालय व खडकवासला ग्रामपंचायत यांच्या सहकार्याने शाळांगण प्रकल्पातील विद्यार्थ्यांमार्फत गावातील भैरवनाथ मंदिर येथे स्वच्छता कार्यक्रम झाला. अभिनेते व दिग्दर्शक सागर तळाशीकर, अशोक शेळके, स्मिता पाटील, अजय शिर्के, जयश्री पोकळे, सौरभ मते, पूनम मते, अरुण हेगडे, स्मिता आपटे, कल्याणी भाबड, विद्या पवार, संजय बांदल यावेळी उपस्थित होते.

मुख्याध्यापिका विद्या पवार यांनी पंख संस्थेच्या कामाचा आढावा घेतला. संस्थेच्या समुपदेशकांमुळे मुलांच्या अभ्यासातील अडचणी दूर होण्यास मदत होऊ लागली आहे असे त्यांनी सांगितले. क्विकहिल कंपनीचे सीएसआर प्रमुख अजय शिर्के यांनी मुलांना शुभेच्छा दिल्या. सूत्रसंचालन मैथिली बंडी यांनी केले. कार्यक्रमाचे नियोजन सचिन भापकर, मृणाल मापुस्कर व श्वेता सूर्यवंशी यांनी केले.